वरळी, मुंबई येथील जागेवर नवीन परिवहन आयुक्त कार्यालय (परिवहन भवन) बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
परिवहन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एमव्हीडी १०२१/प्र.क्र.२९२/परि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : ०३ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा :</u> -

१) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक:- एमव्हीडी-१०२१/प्र.क्र.२९२/परि-४, दि.०२.०३.२०२२.

२) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र- पआका/परिवहन भवन/का-१०/ २०२५ / जा.क्र.१४३३३, दि.२५.११.२०२५.

३) सार्वजनिक बांधकाम विभागाचे पत्र क्र.बीडीजी- २०२६/प्र.क्र.३९/इमा-१, दि.२३.०६.२०२६ अन्वये प्राप्त शासकीय इमारतीच्या बांधकामांना मंजूरी देणेबाबत मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७.०६.२०२६ रोजी झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त वाचा क्र.१ येथील दि. ०२.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये वरळी, मुंबई येथील स्कीम क्र.५२ मधील भूखंड क्र.४७ व ४८ भूकर क्र.७७३ व ७४४ या मिळकतीमधील क्षेत्र अनुक्रमे १६५१.३५ चौ.मी. व १६५० चौ.मी. या जागेवर नवीन परिवहन आयुक्त कार्यालय (परिवहन भवन) याकरिता B+S+Podium १, २+G+१६ मजली इमारत बांधकामास रु. १७९३३.५१ लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि रक्षा मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १८.०५.२०११ रोजीच्या अधिसूचनेमधील मार्गदर्शक तत्वानुसार नौदलाच्या Headquarters, Western Naval command, Mumbai यांनी सुरक्षेच्या कारणास्तव परिवहन भवन इमारतीच्या बांधकामाच्या उंचीबाबत आक्षेप घेत बांधकामाची मान्यता नाकारली आहे.

२. रक्षा मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १८.०५.२०११ रोजीच्या अधिसूचनेमधील मार्गदर्शक तत्वानुसार प्रस्तावित जागेवर चार मजली बांधकाम करता येवू शकते. त्यानुषंगाने परिवहन आयुक्त यांनी संदर्भिय दि.२५.११.२०२५ च्या पत्रान्वये ४B+G+४F असे सुधारित आराखडे व अंदाजपत्रक शासनास सादर केले आहे.

३. शासकीय इमारतीच्या बांधकामांना मंजूरी देणेबाबत मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.१७.०६.२०२६ रोजी झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत मुंबईतील

पावसाळा व समुद्रापासून भूखंडाचे अंतर पाहता प्रस्तावित वरळी, मुंबई येथील जागेवर नवीन परिवहन आयुक्त कार्यालय (परिवहन भवन) या इमारतीसाठी **(2 Basement + G + 4 Floor)** बांधकामाच्या अंदाजित रू. ६७.८३ कोटी किंमतीस सहमती दर्शविली आहे. त्यानुसार उक्त बांधकामास यापूर्वी संदर्भिय दि.०२.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली प्रशासकीय व वित्तीय मान्यता रद्द करून नव्याने प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: -

वरळी, मुंबई येथील जागेवर नवीन परिवहन आयुक्त कार्यालय (परिवहन भवन) या कार्यालयाच्या **(2 Basement + G + 4 Floor)** बांधकामासाठीच्या एकूण रु.६७.८३ कोटी (अक्षरी रुपये सदुसष्ठ कोटी त्र्याऐंशी लक्ष फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी छाननी केल्यानुसार सदर बांधकामाचे **RECAPITULATION SHEET** पुढीलप्रमाणे आहे.

Name of the Department : Home Department

Name of Work : Construction of New Transport Commissioner's Office (Transport Bhavan) at CTS No. 773 &774, Sir Pochkhanawala Road, Worli, Mumbai (2 Basement + G + 4 Floor)

Executing Agency : Public Works Department

Land Availability : Yes

Architect : Private

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars of Scope		Unit Rate Norms Rs Per (Sqmt./Meter/ LumpSum etc.)		Cost in Lakh Component Wise	Cost in Lakh Total
(A)	**ESSENTIAL ITEMS (Components)**					
1	Building Proper (Built Up Area- Sq.m)					
	Basement 1	1481.00	Sq.M	30,000	444.30	
	Basement 2	1481.00	Sq.M	30,000	444.30	
	Ground Floor	1355.20	Sq.M	30,000	406.56	
	First Floor	1403.85	Sq.M	30,000	421.16	
	Second Floor	1403.85	Sq.M	30,000	421.16	
	Third Floor	1403.85	Sq.M	30,000	421.16	
	Fourth Floor	1403.85	Sq.M	30,000	421.16	
	Total B.U.A=	**9932.60**	**Sq.M.**		**Sub Total (A1)**	**2979.78**
2	Raft Foundation	1481	Sq.M	12,500	185.13	
3	Electrification	Internal		5% of (A1)	148.99	
		External		6% of (A1)	178.79	
	Fire Fighting Arrangements etc.			@1200/Sq.M .	119.19	
	Pump House, Bore Well etc.			L.S.	25.00	
	AV Room, Area Lighting,			L.S.	20.00	

	Pumps, Generator					
	CCTV			L.S.	26.00	
	Air Conditioning			L.S.	50.00	
	STP Plant (25 KLD Capacity)			L.S.	80.00	
	Lifts	5.00		25,00,000	125.00	
					Sub Total (2)	**958.09**
4	Water Supply & Sanitary Works		5% of (A1)		**Sub Total (3)**	148.99
5	Furniture	4879.42		10,000	**Sub Total (4)**	487.94
					Sub Total (A)	4574.80
(B)	**MISCELLANEOUS ITEMS**					
	Compound Wall & Gate (Rmt.)			L.S.	50.00	
	Water Main Storage	200000.00	Litres	23	46.00	
	Internal Land Development, Parking, Land Scaping, Soil Investigation etc.		4.5% of (A1)		134.09	
	Hard Rock Excavation			L.S.	150.00	
	Retaining Wall			L.S.	150.00	
	Stack Parking for (66 Stacks : 132 Cars)	66		250000	165.00	
					Sub Total (B)	**695.09**
					Project Cost (P) = (A + B)	**5269.89**
(C)	**PROVISIONS**					
	(i) Contingencies 4% on (Sub Total A1)				**119.19**	
	(ii) GST 18% on (P)				**948.58**	
	(iii) Price Escalation 5% on (P)				**263.49**	
	(iv) PMC Charges 1.5% on (P) (Incl. GST)				**79.05**	
	(v) Labour Insurance 1% on (P)				**52.70**	
	(vi) BMC Charges (L.S.)				**50.00**	
					Sub Total (C)	**1513.01**
					TOTAL COST OF PROJECT (TPC) (A + B + C)	**6782.91**
					Say in Crores	**67.83**
	1. Bldg Civil (A-1) = Rs. 30,000 / Sq.M.					
	2. Bldg Civil, Electrification, Water Supply, Furniture (A) = Rs. 46,058 / Sq.M.					
	3. Total (A+B) = Rs. 53,057 / Sq.M.					

३. सदर प्रशासकीय मान्यता खालील अटींची/ बाबींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

अ) सदर प्रकल्पास Unique ID / Infra ID घेणे बंधणकारक आहे.

आ) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशासह वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे.

इ) उच्चस्तरीय सचिव समितीने मंजूरी दिलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीतच कामे पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात यावी.

ई) इमारतीमध्ये सौर उर्जेचा वापर करावा. त्याचा खर्च किलो व्हॅट क्षमतेनुसार ठरविण्यात यावा.

उ) इमारतीच्या विद्युत बाबींची अधीक्षक अभियंता (विद्युत) यांनी तपासणी करून तांत्रिक सहमती देणे अनिवार्य राहील.

ऊ) उच्चस्तरीय सचिव समितीने मंजूरी दिलेल्या कामांच्या अंदाजपत्रकातील ढोबळ बाबी निविदेमध्ये किंमतीसहीत (Lumpsum Items must be with specification and cost in the tender document) सुस्पष्टपणे नमूद करण्याची दक्षता घेण्यात यावी.

ऋ) सदर बांधकामाची कार्यान्वयीन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग राहील.

ए) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

ऐ) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही २०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दिनांक १०.०१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ओ) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च परिवहन विभागासाठी उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात येईल.

औ) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/इमा-२, दिनांक ०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

अं) नियोजित जागा ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुनच सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात यावी.

४. यासाठी येणारा खर्च “मागणी क्र. एच-८, (०८) परिवहन (०८) (०१) मोठी बांधकामे (योजनांतर्गत) (४०५९०८२३) -५३ मोठी बांधकामे” या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

५. वरळी, मुंबई येथील जागेवर नवीन परिवहन आयुक्त कार्यालय (परिवहन भवन) या कार्यालयाच्या इमारत बांधकामासाठी उपरोक्त वाचा क्र.१ येथील दि. ०२.०३.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली प्रशासकीय व वित्तीय मान्यता रद्द करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत शासन निर्णय, मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.१७.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत प्राप्त मान्यतेनुसार तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदखालील तरतुदीन्वये प्रशासकीय विभांगाना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८०३१५१५५८२८३९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=946F8EFF01148466E26F8D80863DA34D0A26661F5EEFB602C359549D8ED4511E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2026.08.03 15:16:53 +05'30'

(चेतन निकम)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई /नागपूर
५. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग,मंत्रालय यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
६. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
७. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. सह परिवहन आयुक्त (निरीक्षण), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
९. परिवहन उप आयुक्त (लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
१०. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२. कक्ष अधिकारी (अर्थ-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती (परि-४)